साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११००

# दैनिक साहसिक

सजग समाजाचा दक्ष प्रहरी

epaper
www.sahsik.com








वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : २५७ बुधवार १७ एप्रिल २०१९ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये


## दिनविशेष

* महावीर जयंती



## सुविचार

तुमच्या ठायी शक्तिचा
महासागर हेलावतो आहे.
तुम्ही सर्व काही करू शकता,
या गोष्टीवर विश्वास असू द्या.
-स्वामी विवेकानंद

## चारोळी

कितीदा करतो विचार
सये वात का जळावी
जाळून आयुष्य ते सारं
तरी तीच काजळाची....

## हसा जरा जपून..

**बाबा :** काय रे...तुझ्या वर्गात सगळेजण पास झाले का?
**चंदु :** हो आम्ही सगळे पास झालो पण आमच्या मॅडम मात्र नापास झाल्या...
**बाबा :** ओ...मॅडम कशा नापास होतील गाढवा?
**चंदु :** हो बाबा...त्या अजुन त्याच वर्गाला शिकवितात.

# कंत्राटी कामगारा विरोधातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला 'इंडियन बार असोसिएशनचे' सरन्यायाधीशाकडे आव्हान

*विशेष प्रतिनिधी / १६ एप्रिल*

**नवी दिल्ली :** कंत्राटी कामगारांना मुळ कंपनीचे कामगार मानून त्यांना कंपनीच्या सर्व सुविधा व शासकीय नियमाप्रमाणे कंपनीत कायमस्वरूपी नोकरीं देणे बंधनकारक असल्याचा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयाचे संविधान पीठाने बस्ती शुगर मिल प्रकरणात AIR १९६४ SC ३६५ नुसार दिला आहे.

"12. We have therefore come the conclusion that the words "employed by a factory" are wide enough to include workmen employed by the contractors of factory also. " परंतु त्या आदेशाविरुद्ध जाऊन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश रोहिंटन फली नरिमन व न्यायाधीश विनीत सरन यांनी भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड विरुद्ध महेंद्र प्रसाद जखमोला २०१९ SCC OnLine ३८२ प्रकरणात एकूण १२२ याचिकांमध्ये १० हजार कंत्राटी कामगारांच्या बाजूने उच्च न्यायालयाने दिलेला निकाल बेकायदेशीर रद्दबातल ठरवून गरीब कामगार व त्याच्या परिवारांवर अन्याय केल्या प्रकरणाची दखल घेत इंडियन बार असोसिएशनने पुढाकार घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या इन हाऊस प्रोसिजर अंतर्गत मा. सरन्यायाधीश श्री. रंजन गोगोई यांच्याकडे तक्रार दाखल करून दोन्ही न्यायाधीशांना बडतर्फ करून त्या बेकायदेशीर आदेशाचे पुनर्विलोकन घटनापीठाचे सुप्रीम कोर्ट बार असोसिएशन (१९९८) ४ SCC ४०९ प्रकरणातील आदेशाप्रमाणे करून दोन्ही न्यायाधीशाविरुद्ध भा.दं.वि. २१९ अंतर्गत व न्या. कर्णन प्रकरणांत (२०१७) ७ SCC १ ठरवून दिलेल्या कायद्यानुसार कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

विशेष म्हणजे याआधीसुद्धा त्याच न्यायाधीशांना कायद्याचे ज्ञान नसून त्यांची अकार्यक्षमता सिद्ध झाल्यामुळे व ते आपल्या पदाचा दुरूपयोग करून बेकायदेशीर आदेश पारित करून पात्र लोकांना न्यायापासून वंचित ठेवतात व अपात्र लोकांना फायदा पोहोचवितात, वकिलांवर दहशत बसविण्यासाठी कोर्ट अवमानना कायद्याचा दुरूपयोग करतात. स्वत:च्या वडील ॲड. फली नरिमन यांना देशद्रोहाच्या आरोपातून वाचविण्यासाठी स्वत:च बेकायदेशीर आदेश पारित करून सर्वोच्च न्यायालयाची प्रतिष्ठा कमी करत असून स्वत: आरोपी असलेल्या प्रकरणात स्वत:च आदेश पारित करून फिर्यादी वकील व मानव अधिकार कार्यकर्ते यांना कोर्ट अवमानांच्या कारवाईची धमकी देतात. अश्या स्वरूपाच्या तक्रारी संपूर्ण कागदोपत्री पुराव्यासह मा. सरन्याधिशाकडे चौकशीसाठी प्रलंबित आहे.



विशाल जनसभेस संबोधित करताना इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले.



थोर समाजसेवक अण्णा हजारे यांनी इंडियन बार असोसिएशनच्या महाआंदोलनाला पाठींबा जाहिर केला त्यावेळेस अण्णांसोबत उपस्थित इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. निलेश ओझा व पदाधिकारी.

* **बेकायदेशीर आदेश रद्द करण्याची मागणी**
* **सदर अन्यायकारक व घटनाबाह्य निर्णय देणारे संबंधित न्यायाधीश न्या. रोहिंटन नरिमन व विनीत सरण यांच्याविरुद्ध 'इन-हाऊस-प्रोसिजर'नुसार कारवाई करून त्यांना तात्काळ बडतर्फ करण्याची केली मागणी**
* **दिवसाढवळया कंत्राटी कामगारांचे देशभरात होणारे आर्थिक व शारीरिक शोषणाविरोधात 'इंडियन बार असोसिएशनचा' हल्लाबोल**
* **इंडियन बार असोसिएशनच्या पुढाकाराने देशभरातील करोडो कंत्राटी कामगारांना फायदा होणार**
* **देशभरातील विविध कामगार संघटनांकडून इंडियन बार असोसिएशनच्या पुढाकाराचे स्वागत व पाठींबा जाहीर**

## दत्तक मुलीने फळांमधून आई-वडिलांना गुंगीचं औषध दिलं, नंतर प्रियकराच्या मदतीने त्यांना संपवलं!



*प्रतिनिधी / १६ एप्रिल*

**नागपूर :** नागपूरमधील वृद्ध दाम्पत्याच्या हत्या प्रकरणात धक्कादायक उलगडा झाला आहे. चंपाती दाम्पत्याची हत्या त्यांची मुलगी आणि तिचा बॉयफ्रेण्डने केल्याचं समोर आलं. महत्त्वाचं म्हणजे ही आरोपी प्रियांका ही चंपाती दाम्पत्याची दत्तक मुलगी आहे.

वाडी भागातील सुरक्षानगर परिसरात राहणाऱ्या ७३ वर्षीय शंकर चंपाती आणि ६५ वर्षीय सीमा चंपाती या दाम्पत्याची रविवारी (१४ एप्रिल) हत्या झाली होती. राहत्या घरी वेगळवेगळ्या खोल्यांमध्ये त्यांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले होते. या दुहेरी हत्येप्रकरणी चंपाती यांची २३ वर्षीय मुलगी प्रियांका आणि तिचा २३ वर्षीय प्रियकर मोहम्मद इकलाक खान या दोघांना पोलिसांनी अटक केली. तर त्यांचा आणखी एक मित्र फरार आहे.

कमी शिक्षित, इतर धर्मीय मुलाच्या प्रेमात पडलेल्या उच्चशिक्षित मुलीवर वडिलांचा राग आणि अनेक वर्ष सांभाळ करणाऱ्या पालकांपेक्षा प्रियकरच जास्त प्रिय अशा बाप-लेकीच्या विचारद्वंदातून हे हत्याकांड घडल्याचं आतापर्यंतच्या तपासात समोर आलं आहे.

# शिवसेना ही खुर्चीसाठी एकत्र आली नसून देशासाठी एकत्र आली : उद्धव ठाकरे




*जिल्हा प्रतिनिधी / १६ एप्रिल*

**अमरावती :** गेल्या २५ वर्षांपासून येथे भगवा फडकत आहे. संसदेत काम करणारा व भांडणारा प्रतिनिधी पाहिजे. जुने व नवे शिवसैनिक एकत्र आले याचा मला अभिमान आहे, मात्र आज संजुभाऊ नाहीत, याचे दु:ख उध्दव ठाकरे यांनी सभेत व्यक्त केले. याहीवेळी आनंदराव अडसूळ प्रचंड मतांनी विजयी होतील, असा विश्वास शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी व्यक्त केला. शिवसेना ही खुर्चीसाठी एकत्र आली नसून देशासाठी एकत्र आली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात राम मंदिराचा उल्लेख नाही. राम मंदिर झालेच पाहिजे. त्यासाठी शिवसेना उभी आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर केली, कर्जमाफीतील जाहीर अटी काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र सरकारच्या योजना गरिबापर्यंत पोहोचल्या पाहिजे, त्याची जबाबदारी शिवसेना घेणार आहे. शिवसैनिकांचा भगवा कोणीही काढू शकणार नाही. भगव्याला हात लावल्यास शिवसैनिक तुटून पडेल, असा इशारा विरोधकांना उध्दव ठाकरे यांनी दिला आहे. ते महायुतीच्या अमरावती येथील महाविजयी संकल्प सभेत अमरावती येथे बोलत होते.

पुढे म्हणाले शेतकरी आजही कर्जबाजारी आहे. शिक्षण, लग्न कसे करणार, या मनस्थितीत सापडला आहे. त्यावर उपाययोजना करणार असल्याचे उध्दव ठाकरे यांनी म्हटले. काँग्रेस- राष्ट्रवादीचे दरोडेखोर दुसऱ्याला चोर म्हणतात. गेल्या ७० वर्षात घोटाळे करून देशाचे वाटोळे केले आहे. पाकिस्तानने काँग्रेसच्या काळात भारतावर हल्ले केले. मात्र त्याला प्रतिउत्तर दिल्या गेले नाही. नरेंद्र मोदींनी ४२ जवान शहीद झाल्यावर तेराच दिवसात पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले. मी मोदींना

(उर्वरित पान २ वर)



# नवनित राणा ठरल्या महिला शक्तीची प्रथम पसंती

*जिल्हा प्रतिनिधी / १६ एप्रिल*

**अमरावती :** येथिल लोकसभा निवडणूकीसाठी प्रचार सुरू होण्याच्या आधीपासूनच प्रत्येक समाजातील सुख-दु:खात सहभागी होऊन आपले सामाजिक दायित्व सिद्ध करणाऱ्या नवनीत रवी राणा सभेच्या प्रचारास सुद्धा कमाल कमालीची आघाडी घेतली आहे.

विशेष म्हणजे अमरावती जिल्हा व अमरावती शहरातील तरुणींची प्रथम पसंती ठरलेल्या नवनीत रवी राणा यांनी आता विजयाकडे जोरदार वाटचाल केल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्याची सून म्हणून राजकीय

(उर्वरित पान २ वर)





